## नियमित दिवाणी दावा क्र. ५२/२०२५ मध्ये निशाण १५ वरील आदेश

अर्जाचे बारकाईने अवलोकन केले.

**०२.** सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम १५१ अन्वये दाखल केलेला आहे. त्यांचे अर्जातील कथनानुसार वादीने जाणीवपूर्वक बऱ्याच बाबी न्यायालयापासून लपवून सदर दावा दाखल केलेला आहे. वादीने कधीच प्रतिवादीचे मिळकतीतून रस्ता वापरलेला नव्हता व नाही. उलट सदर मिळकत खरेदी केलेपासून आजतागायत एकदाही वादी सदर मिळकतीत गेलेला नसल्यामुळे त्याला हरकत करणेचा प्रश्नच उद्भवत नाही. वादीने धादांत खोटे खोडसाळ काल्पनिक कारण नमूद केलेले आहे. प्रतिवादी क्र. १ यांचे दि. १४/१२/२०२३, प्रतिवादी क्र. ३ यांचे दि. २८/०७/२०२४ व प्रतिवादी क्र. ४ यांचे दि. १५/०९/२०२५ रोजी निधन झालेले असताना जाणीवपूर्वक वादीने सदर मयत व्यक्ती विरूध्द दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करीत प्रतिवादी क्र. २ यांनी वादीने मृत व्यक्ती विरूध्द दावा दाखल केल्यामुळे दावा खर्चासह फेटाळण्याची व वादीने न्यायालयाला जाणीवपूर्वक खोटी माहिती देवून कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर करून न्यायालयाचा वेळ घालविला असल्याने वादीला जास्तीत जास्त दंड आकारण्याची विनंती केली.

**०३.** वादीने निशाण १७ येथे दाखल केलेल्या अर्जाप्रमाणेच सदर अर्जावर म्हणणे असल्याची निशाण १९ येथे पुरशिस दाखल केलेली आहे. वादीचे निशाण १७ येथील अर्जातील कथनानुसार न्यायालयाचे आदेशान्वये प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स व कारणे दाखवा नोटीस पाठविणेत आली. त्यानुसार प्रतिवादी क्र. २ व ५ यांना समन्स व नोटीसची बजावणी करणेत आली. प्रतिवादी क्र. २ तर्फे न्यायालयास प्रतिवादी क्र. १, ३ व ४ हे मयत असल्याचे कळविणेत आले. तसेच निशाण १५ येथे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांचेपूरता दावा डिसमिस करण्याबाबत अर्ज देण्यात आला. सदरचा अर्ज हा

दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम १५१ प्रमाणे देण्यात आला आहे, परंतु, तसा अर्ज कोणत्याही पक्षकारास देता येत नाही. वादीने प्रस्तुत दावा दाखल करण्यापूर्वी पासूनच प्रतिवादी क्र. १ ते ५ हे आळीपाळीने वादी यांना हरकत करीत हाते. त्यामुळे वादी यांनी केवळ मल्टीप्लीसीटी ऑफ प्रोसिडींग टाळण्याकरिता म्हणून एकाच दाव्यातील सर्व प्रतिवादींना पक्षकार म्हणून सामील केले. परंतु, प्रतिवादी क्र. १, ३ व ४ हे मयत असल्याचे प्रतिवादी क्र. २ ने दाखल केलेल्या मृत्यू दाखल्यावरून दिसत असल्याने सदर प्रतिवादींविरूध्द हा दावा पुढे चालविणेचा नाही. तसेच वादीचे माहितीप्रमाणे हे प्रतिवादी अविवाहीत होते. त्यामुळे वादीने सदर अर्ज दाखल करीत प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांना डिलीट करण्याची व प्रतिवादी क्र. २ व ५ यांचे विरूध्द दावा पुढे चालविणेची विनंती केलेली आहे.

**०४.** अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले. युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. २ यांनी निशाण १३/१ येथे प्रतिवादी क्र. १ यांचे मृत्यू प्रमाणपत्राची झेरॉक्सप्रत, निशाण १३/२ येथे प्रतिवादी क्र. ३ यांचे मृत्यू प्रमाणपत्राची झेरॉक्सप्रत व निशाण १३/३ येथे प्रतिवादी क्र. ४ यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत दाखल केलेली आहे. सदर दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ हे दि. १४/१२/२०२३, प्रतिवादी क्र. ३ हे दि. २८/०७/२०२४ व प्रतिवादी क्र. ४ ह्या दि. १५/०९/२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते.

**०५.** वादीने निशाण १७ येथे अर्ज दाखल करताना प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांना डिलीट करण्याची विनंती करत प्रतिवादी क्र. २ व ५ यांचे विरूध्द दावा चालविण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत निशाण १५ खालील अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम १५१ अन्वये दाखल केलेला आहे. सदर तरतूदीचा वापर अतिशय अपवादात्मक परिस्थितीमध्ये व दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये इतर कोणत्याही ठिकाणी तरतूद नसल्यास करण्यात यावा असे मा. उच्च न्यायालयाचे निर्देश (rulings) आहेत. प्रस्तुत अर्ज व वादी याचा निशाण १७ येथील अर्ज वजा म्हणणे याचा एकत्रीत विचार करता न्यायाचे दृष्टीने वादीला सदर दावा चालविण्याची परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. तरी वरील सर्व चर्चेअंती मी खालील प्रमाणे आदेश पारित

करीत आहे:–

## <u>आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

JOSHI SNEHAL RAJAN Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN Date: 2026.04.10 17:43:48 +0530

**दिनांक :१०/०४/२०२६** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण–लांजा** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**लांजा,जि.रत्नागिरी**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 10/04/2026 |
| Order Signed by P.O. on | :- | 10/04/2026 |
| Order uploaded on | :- | 10/04/2026 |